दि. १४.०२.२०२४

प्रेस नोट

आरोपी लोकसेवक क्र १ काकासाहेब सिध्देश्वर डोईफोडे, वय ३९ वर्षे, धंदा– नोकरी, पद– मुख्याधिकारी, वर्ग १, नेमणुक– नगर परिषद, अहमदपुर, ता. अहमदपुर, जि. लातूर, आरोपी लोकसेवक क्र २ अजय विजयकुमार कस्तूरे, वय ५५ वर्षे, धंदा– नोकरी, पद– नगर रचनाकार, वर्ग २, नेमणुक– जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, अतिरीक्त कार्यभार नगर परिषद, अहमदपुर वर्ग २, रा. मोती नगर, कव्हेरी रोड, बोरा शॉप च्या बाजूस, लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून गुन्हा.

यातील आरोपी लोकसेवक क्र १ काकासाहेब सिध्देश्वर डोईफोडे, मुख्याधिकारी व लोकसेवक क्र २ अजय विजयकुमार कस्तुरे, नगर रचनाकार यांनी तक्रारदार यांच्या मौजे मरशिवणी, ता. अहमदपूर, जि. लातूर, येथील सर्वे नंबर ५६ मधील ३६०० चौ.मी. क्षेत्रास वाणिज्य प्रयोजनार्थ जमीन विकासाची प्राथमिक परवानगी प्राप्त झालेली असुन त्यामध्ये अंतिम परवानगी मिळणेकरीता नगर परिषद अहमदपूर, जि. लातूर येथे दाखल केलेल्या प्रकरणांमध्ये दि २५/१०/२०२३ रोजी चालान भरणा केलेला आहे. तक्रारदार हे त्यांचे प्रलंबित कामाकरिता दि. ०५/०२/२०२४ रोजी नगर परिषद, कार्यालय अहमदपूर येथे गेले असता वर नमुद लोकसेवक कमांक २ यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रलंबित कामाकरिता स्वत:साठी व मुख्याधिकारी नगरपरिषद अहमदपूर यांच्यासाठी असे मिळून एकूण ७,००,०००/– रूपये लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. १३/०२/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. १४/०२/२०२४ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, वरील प्रमाणे प्राप्त तक्रारी नुसार आलोसे क्र १ डोईफोडे, मुख्याधिकारी व आलोसे क्र २ कस्तुरे, नगर रचनाकार यांनी तक्रारदार हे नगर परिषद, कार्यालय अहमदपूर येथे गेले असता वर नमुद लोकसेवक कमांक २ यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रलंबित कामाकरिता स्वत:साठी व मुख्याधिकारी नगरपरिषद अहमदपूर यांच्यासाठी असे मिळून एकूण ७,००,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ५,००,०००/– रूपये आलोसे क्र १ डोईफोडे, मुख्याधिकारी यांनी आलोसे क्र २ कस्तुरे, नगर रचनाकार यांच्याकडे देण्यास सांगीतले. तक्रारी प्रमाणे लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

त्यानुसार लागलीच आज दि. १४/०२/२०२४ रोजी तक्रारदार हे आरोपी लोकसेवक क्र २ कस्तुरे, नगर रचनाकार यांना लाचेची रक्कम देण्यासाठी नगर परिषद, अहमदपुर येथील आवारात गेले असता आलोसे क्र २ कस्तुरे हे नगर परिषद अहमदपुर समोरील मोकळ्या जागेत तक्रारदार यांच्या केटा कार मध्ये आलोसे क्र २ कस्तुरे यांनी पंचासमक्ष लाचेची रक्कम स्विकारली त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहाथ पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आलोसे क्र १ डोईफोडे, मुख्याधिकारी व आलोसे क्र २ कस्तुरे, नगर रचनाकार यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन अहमदपूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे. सदर गुन्हयाचा तपास श्री. भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड व मा. रमेशकुमार स्वामी, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/फारूक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, भिमराव आलुरे, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, मपोकॉ/रूपाली भोसले पोकॉ/संदिप जाधव, गजानन जाधव, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील कमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल कमांक ०९६२३९९९९४४ |
| २) | श्री. भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक | :– | मोबाईल कमांक ०९९२११३९७९७ |
| ३) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन कमांक कार्यालयाचा फोन कमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/maharashtraACB |
| ८) | Twitter | :– | ACBlatur |
| ९) | Instagram | :– | Acblatur |
| १०) | YouTube Channel | :– | anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर